# दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., अमरावती
# मुख्य कार्यालय इर्विन चौक, कॅम्प रोड, अमरावती ४४४६०३

लिपीक पदे भरण्याकरीता निवड सुची तयार करणेसाठी खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील सरळ सेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या. पुणे (एम.के.सी.एल) या शासनमान्य संस्थेमार्फत ऑनलाईन अर्ज मागविण्यांत येत आहेत.

## ऑन लाईन अर्ज स्विकारण्याचा अवधी दि. १४-१२-१२ ते ३१-१२-२०१२

## १) पदाचे नांव :- लिपीक

**प्रवर्गानुसार भरावयाच्या जागा.**

| तपशिल | अजा | अ.ज. | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लिपीक | १९ | ०९ | ०५ | ०४ | ०४ | ०३ | ०३ | ४४ | ०९ | १०० |

**टिप :-** अ) वर नमुद पद संख्येमध्ये बदल होवू शकतो त्यामुळे जातीच्या प्रवर्गनिहाय आरक्षीत पदांची संख्या सुध्दा कमी/जास्त होवू शकते.

| तपशिल | अ.जा. | अ.ज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला | ०७ | ०२ | ०२ | ०२ | ०२ | - | ०१ | १४ | - | ३० |
| अंपग | ०१ | - | - | - | - | - | - | ०२ | - | ०३ |
| माजी सैनिक | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | - | - | ०७ | ०१ | १५ |
| प्रकल्पाग्रस्त/भुंकपग्रस्त | ०१ | ०१ | - | - | - | - | - | ०२ | ०१ | ०५ |
| प्रवर्गातील इतर | ०७ | ०५ | ०२ | ०१ | ०१ | ०३ | ०२ | १९ | ०७ | ४७ |
| **एकुण ---)** | १९ | ०९ | ०५ | ०४ | ०४ | ०३ | ०३ | ४४ | ०९ | १०० |

ब) वरील पद संख्येत महिला, अपंग, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त इ. उमेदवारांना समांतर आरक्षण शासकिय नियमानुसार राहील.

**२) शैक्षणिक अर्हता :-** उमेदवार हा मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किमान ५०% गुणासह आणि वाणिज्य पदविधर असल्यास ४५% गुणासह उर्त्तीर्ण केलेली असावी व तसेच उमेदवाराकडे संगणक अर्हता असणे अनिवार्य राहील. त्याकरीता आपणाकडे MSCIT परिक्षा अथवा संगणक परिक्षा उर्त्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**३) वयोमर्यादा :-** (दि. १-१२-२०१२ रोजी)

१) खुल्या प्रवर्गातील श्रेणीसाठी वय किमान १८ ते ३३
२) मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांचे बाबतीत वयोमर्यादा ३८ वर्षे राहील.
३) अपंग, माजी सैनिक, भुकंपग्रस्त/ प्रकल्पग्रस्त उमेदवारांकरीता वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.
४) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्रानुसार / एस.एस.सी. प्रमाणपत्रानुसार जन्म तारीख गृहीत धरण्यात येईल.

**४) वेतनमान :-** प्रचलित वेतन श्रेणी रुपये ३७००-१५०-४४५०-२००-५४५०-२५०-११२०० नुसार परिविक्षा कालावधी नंतर पगार देय राहील. (परिविक्षा कालावधीनंतर मिळणारे एकूण वेतन रुपये १४०००/-)

**५) निवड कार्यपध्दती :-**

**अ) लेखी परीक्षा :-** ७५ गुणाची लेखी परीक्षा घेण्यांत येईल. सदर परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तूनिष्ठ व पर्यायी स्वरुपाच्या असतील. हयामध्ये बँकींग इंग्रजी, सामान्य ज्ञान, गणीत व बौध्दीक चांचणी या विषयांवरील प्रश्नांचा समावेश असेल.

**ब) मुलाखत :-** लेखी परीक्षेत उर्तीर्ण उमेदवारांना पदसंख्येच्या प्रमाणांत लेखी परीक्षेचे गुणानुक्रमे २५ गुणासाठी मुलाखतीस बोलाविण्यांत येईल.

**क) उमेदवारांची अंतीम निवड सुची :-** निवड करण्यांत आलेल्या उमेदवारांना प्रथम २ वर्षासाठी परीविक्षाधीन (प्रोबेशन) सेवेत नेमणुक दिल्या जाईल. नेमणुक दिलेल्या उमेदवारांस परिविक्षाधीन कालावधीमध्ये दरमहा एकत्रीत रुपये **५०००/-** मासिक वेतन देण्यांत येईल.

निवड समिती प्रतिनिधींनी मोजदाद केलेल्या मुलाखती गुंणाची सरासरी + लेखी परीक्षेतील गुण यांची गुंणानुक्रमे अंतीम निवड सुची तयार करण्यांत येईल.

उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहील्यास तो निवडीस पात्र राहणार नाही.

**ड)** निवड झालेल्या उमेदवारांने अमरावती जिल्हयातील बँकेच्या कोणत्याही शाखेवर काम करणे बंधनकारक राहील.

## ६) आवेदन शुल्क :-

प्रवर्गनिहाय पदाकरीता खालीलप्रमाणे आवेदन शुल्क आकारण्यांत येईल.

| | |
|---|---|
| खुला प्रवर्ग | ६५० + रु. २५ बँक चार्जेस |
| मागासवर्गीय प्रवर्ग | ३२५ + रु. २५ बँक चार्जेस |
| अपंग प्रवर्गाकरिता | ३२५ + रु. २५ बँक चार्जेस |

६.१ सदर आवेदन शुल्क हे नापरतावा राहील. आवेदन शुल्कचा भरणा चलानव्दारे स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या कोणत्याही शाखेत करता येईल. उपरोक्त नमुद शुल्क व्यतिरिक्त सेवा शुल्क बँक चार्जेसनुसार अदा करावयाचे आहेत.

६.२ जे मागासवर्गीय उमेदवार उन्नत (क्रिमीलेअर) मोडतात अशा उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांप्रमाणे आवेदन शुल्क भरणे आवश्यक आहे.

## ७) आरक्षण :-

७.१ आर्थिक वर्ष २०११-१२ चे नॉन क्रिमीलेयर (उन्नत व प्रगट गटांत मोडत नसल्याबाबत) प्रमाणपत्र विमुक्त जाती / भटक्या जमाती, विमाप्र, इमाव प्रवर्गातील उमेदवारांसाठी आवश्यक राहील.

७.२ उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे सक्षम अधिका-यांनी निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. उमेदवारांचे अंतीमत: निवड झाल्यानंतर शासकिय निर्णय बीसीसी-२०११/प्र.क्र. १०६४/२०११ /१६- ब दि. १२ डिसेंबर २०११ नुसार उमेदवाराने नियुंक्ती आदेशाच्या दिनांकापासुन ६ महिण्यांचे आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता जात पडताळणी समिती कडुन करुन घेणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास अशा उमेदवारांची नियुक्ती रध्द करुन जातीचे प्रमाणपत्र देण्यांचे व त्यांचे पडताळणीचे विनियमन, अधिनियम २००० यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यांत येईल.

७.३ माजी सैनिक असल्यास त्याबाबतचे सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र आवश्यक (फक्त माजी सैनिक राखीव पदासाठी)

७.४ महिलांच्या आरक्षणाचा (विमुक्त जाती / भटक्या जमाती, विमाप्र, इ.मा.व व खुला प्रवर्ग) लाभ घेणा-या इच्छुक महिला उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिका-यांकडुन ते नॉन क्रिमीलेयर प्रवर्गात असल्याचे दर्शविणारे चालु वर्षाचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करावे.

७.५ महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असल्याबाबत सक्षम अधिका-याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७.६ वर नमुद केलेली सर्व प्रमाणपत्रे ज्या उमेदवारांना लागू आहेत. त्यांनी ती मुळ प्रतिसह (ओरीजीनल) पडताळणीसाठी दाखल करणे आवश्यक आहे.

**पुढील अपंगत्व असलेले उमेदवार पात्र आहेत.**

अ) लो व्हीजन (LV) ब) अल्प बहीरेपणा (PD)क) अस्थीव्यंग असलेले (एका पायाने अधु, एका हाताने अधु) (DL, OA) अपंगासाठी आरक्षणाचा लाभ घेणा-या अपंग उमेदवाराने त्याचे अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असल्याबाबतचे विहीत नमुन्यातील जिल्हा शल्य चिकित्सक हयांचे प्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

## ८) अर्ज करण्यांची पध्दती :-

८.१ पात्र उमेदवाराने अर्ज http://oasis.mkcl.org/amdcb हया संख्येत स्थळावर भरावयाचा आहे.

८.२ उमेदवाराने ऑन लाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे आणी स्वतःचा अलीकडील काळांतील पासपोर्ट साईज फोटो व सहीची Scanned image स्वतः जवळ असण्यांची खात्री करावी. फॉर्म भरतेवेळी आपल्याला फोटो व सहीची Image Upload करावी लागेल.

८.३ ऑन लाईन अर्ज भरण्यासाठी **"Apply Online"** हया लिंकवर क्लिक करुन अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

८.४ आपल्यास विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर **(Yes /No)** पैकी योग्य पर्याय निवडा. संगणक प्रणालीत तुम्ही दिलेल्या उत्तराच्या आधारे तुमची प्राथमिक पात्रता तपासेल.

८.५ आवश्यक माहीती भरल्यानंतर संगणक प्रणाली तुमचा लॉगीन आय.डी. पासवर्ड आणी एस.बी.आय. चलान निर्माण करुन तुम्हांला तुमच्या स्क्रिनवर लॉगीन आय.डी. पासवर्ड दाखवेल आणी तुम्ही पुरविलेला मोबाईल क्रमांकावर SMS करेल (कुपया आपण आपला मोबाईल क्रमांक अचूक टाकावा जेणे करुन आपल्याला लॉगीन आय.डी.आणी पासवर्डची माहीती आपल्या मोबाईल क्रमांकांवर SMS व्दारे प्राप्त होईल) हा लॉगीन आय.डी. म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असेल.

८.६ तुमचा लॉगींन आय.डी. आणी पासवर्डची माहीती व चलान **"Print My Login Challan Details"** हया बटनवर क्लिक करुन प्रिंट करावी.

८.७ चलान प्राप्त केल्यावर कार्यालयीन कामकाजाच्या दुस-या दिवशी आपल्या नजीकच्या भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये जावे व चलानवर दर्शविलेले शुल्क बँकेत जमा करावे. बँक तुम्हाला शुल्क जमा केल्याचे पोहोच देईल.

८.८ कृपया शुल्क चलानवर दर्शविलेल्या अंतीम तारखेच्या आंत भरा. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

८.९ भारतीय स्टेट बँकेत चलानव्दारे शुल्क भरल्यानंतर कार्यालयीन कामकाजाचे दुस-या दिवशी उर्वरीत ऑन लाईन अर्ज **"Fill Application Form / अर्ज भरा"** हया लिंकवर क्लिक करुन अर्ज पुर्ण भरावा. भारतीय स्टेट बँकेत चलानव्दारे शुल्क भरल्यानंतर अर्जदाराने अर्जामध्ये खालील माहीती भरुन अर्ज पुर्ण करणे आवश्यक आहे. त्याशिवाय आपला अर्ज पुर्ण होणार नाही.

*** वैयक्तिक माहीती * आरक्षण बाबतची माहीती * शैक्षणिक अर्हता * फोटो आणी सही अपलोड * कामाचा अनुभव * इतर आवश्यक माहीती.**

वरील सर्व माहीती अर्जामध्ये भरावी ती भरल्याशिवाय आपला अर्ज पुर्ण होणार नाही. माहीती भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून आपल्या माहीतीसाठी जतन करुन ठेवावी. ऑन लाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रत बँकेस किंवा MKCL ला पाठविण्यांची आवश्यकता नाही. तुमची अर्ज प्रक्रिया येथे पुर्ण होते. अर्जदाराने नियमितपणे वेबसाईट चेक करावी. लेखी परीक्षेचे ओळख पत्र परिक्षापुर्वी व तुमच्या लॉगीनमध्ये व वेबसाईट वर उपलब्ध राहील. हयासाठी वेगळा पत्र व्यवहार केला जाणार नाही. कृपया हयाची नोंद घ्यावी.

## ९) महत्वाच्या तारखा :-

| | |
|---|---|
| **Website Link Open (अर्ज करण्यांची तारीख)** | **१४-१२-२०१२ ते ३१-१२-२०१२** |
| **SBI शाखेमध्ये शुल्क अदा करणे.** | **१४-१२-२०१२ ते २-१-२०१३** |
| **अर्ज पुर्ण करण्यांची तारीख** | **१५-१२-२०१२ ते ४-१-२०१३** |
| **लेखी परिक्षेची संभाव्य तारीख** | **२०-१-२०१३** |

## १०) सर्व साधारण अटी / सुचना :-

१०.१ अर्ज भरण्यापुर्वी अर्जदाराने जाहीरातीत नमुद केलेल्या सर्व आवश्यक अर्हता आपण पुर्ण करीत आहोत कां याची खात्री करुन घ्यावी. बँक उमेदवार मुलाखतीकरीता पात्र असल्यानंतर मुळ दस्तऐवजा संदर्भातील अर्हतेच्या अटीची पडताळणी करेल. या जाहीरातील नमुद करण्यांत आलेल्या विहीत आवश्यक अर्हतेच्या पुर्तीच्या अधीन राहून उमेदवारांचा भरती प्रक्रियेमधील प्रवेश पुर्णतहः तात्पुरता असेल.

१०.२ ज्या उमेदवारांनी ऑन लाईन नोंदणी केलेली आहे. आणी आवश्यक आवेदन शुल्क अदा केलेले आहे, त्यांना लेखी परीक्षेकरीता Online Call Letters Download करण्यांची मुभा आहे. Online Call Letters पाठवितांना अर्जाची तपशिलवार छाननी करण्यांत येणार नाही. Call Letters http://oasis.mkcl.org/amdcb या संकेत स्थळावरुन Download करता येईल.

१०.३ जाहीरात देण्यांत आलेल्या पदाकरीता लेखी चांचणी, व्यक्तीगत मुलाखत आणी निवड झालेल्या उमेदवारांची यादी वेळोवेळी बँकेच्या http://oasis.mkcl.org/amdcb या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

१०.४ भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने सादर केलेली माहीती खोटी / चुकीची आढळून आली तर त्याच्या/ तिच्या उमेदवारीचा विचार केल्या जाणार नाही.

१०.५ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी अर्जात व अर्जासोबत दिलेली माहीती/कागदपत्रे/प्रमाणपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहीती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी व नियुक्ती निवड प्रक्रियेच्या / सेवेच्या कोणत्याही टप्प्यावर रध्द करण्यांत येईल.

१०.६ परिक्षेस बसण्यास दिलेली परवानगी म्हणजे विविक्षित पात्रता नसुन उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड झाल्यास अंतीम निवडीपुर्वी त्यांची मुळ प्रमाणपत्रे छाननीच्या अधिन राहून परिक्षेला बसण्याची परवानगी देण्यांत येत आहे.

१०.७ भरती संबंधांतील बँकेचे सर्व निर्णय अंतीम असतील. आणी कोणत्याही व्यक्तीगत पत्र व्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

१०.८ लेखी परीक्षेचे माध्यम मराठी राहील.

१०.९ परीक्षा अमरावती शहरातील परीक्षा केंद्रामध्ये घेण्यांत येईल.

१०.१० उमेदवार अर्ज करण्यास पात्र असल्याबाबत आणी ऑनलाईन अर्ज अचुक भरण्याबाबतची वैयक्तिक जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेंच ऑन लाईन अर्ज भरतांना कोणत्याही स्थरावर चुकीची माहीती भरल्यामुळे अर्ज अपात्र ठरल्यास त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

१०.११ लेखी परीक्षेनंतर ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलवावयाचे आहे अशा उमेदवारांना मुलाखतीपुर्वी कागदपत्रे पडताळणीसाठी स्वखर्चाने बोलाविण्यांत येईल.

१०.१२ सहाय्यक संचालक , जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार मार्गदर्शन केंद्र अमरावती, प्रकल्प अधिकारी एकात्मीक विकास प्रकल्प धारणी, जिल्हा सैनिक बोर्ड, या कार्यालयाकडे नोंदणी असलेल्या उमेदवारांने जाहीरातीतील विहीत केलेले परिक्षा शुल्क भरुन अर्ज करणे आवश्यक राहील. सदर अर्ज न करणा-यांचा विचार केल्या जाणार नाही.

१०.१३ भरती प्रक्रियेत /निवड कार्यपध्दतीत / जाहीरातीत अंशतः अथवा पुर्णता बदल किंवा रध्द करण्यांचा अधिकार निवड समितीस राहील. व त्याबाबत MKCL चे संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या जाईल व उमेदवारांना लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.

ठिकाण :- अमरावती
दिनांक :- १३-१२-२०१२

**प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी** **अध्यक्ष**

**दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अमरावती**